महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 30 एप्रिल, 2020
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 01 मे, 2020

----------0000----------

क्र दंडप्र-01/कावि/2020/226 दिनांक 18 मे, 2020

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद महाराष्ट्र शासन यांचेकडील सुधारीत आदेश दिनांक 30 एप्रिल, 2020 अन्वये लॉकडाऊन कालावधीत विविध राज्यात, जिल्हयात अडकलेले स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांना जळगांव जिल्हयातून त्यांच्या इच्छित स्थळी (आंतरराज्य, राज्यांतर्गत) जाण्यासाठी व जळगांव जिल्हयात येण्यासाठी सुट देण्यात आलेली आहे. त्यामुळे मोठया प्रमाणावर जळगांव जिल्हयाच्या बाहेरुन स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती जळगांव जिल्हयात येत असल्याचे माझ्या निदर्शनास आलेले आहे. तसेच अशा प्रकारे जळगांव जिल्हयाच्या बाहेरुन येणा-या स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांना संस्थात्मक विलगीकरणात ठेवणे व त्यांना शासनाकडील निर्देशाप्रमाणे सुचनांचे पालन करण्याचे जबाबदारी ग्रामस्तरीय अधिकारी उदा. तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, शिक्षक व इतर कर्मचारी यांचेवर निश्चित करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव यांचेमार्फत आदेश, सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याअर्थी, मी, **डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

1) जळगांव जिल्हयाच्या बाहेरुन येणा-या सर्व संबंधित स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांचे संस्थात्मक विलगीकरण शासन निर्देशानुसार योग्य पध्दतीने होणे आवश्यक असून संबंधितांना कोव्हिड-19 विषाणूचा प्रादुर्भाव वाढू नये याकरीता Social Distancing, मास्कचा वापर करणे, सॅनिटाईजर्स वापरणे, इतर जनमानसात न मिसळणे याबाबतच्या सूचना, निर्देश देण्याकरीता व संस्थात्मक विलगीकरण प्रभावीपणे राबविण्याकामी सर्व संबंधित ग्रामस्तरीय अधिकारी यांनी त्यांच्या मुख्यालयी राहणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

2) जळगांव जिल्हयातील काही ग्रामस्तरीय अधिकारी उदा. तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, शिक्षक व इतर कर्मचारी हे त्यांच्या कर्तव्याच्या ठिकाणी (मुख्यालय) राहत नसल्याबाबत जळगांव जिल्हयातील नागरीकांकडून येणा-या तक्रारी व काही माध्यमात येणा-या बातम्यांमधून निदर्शनास आलेले आहे. सदर बाबींचा विचार करता, जळगांव जिल्हयाच्या बाहेरुन येणा-या सर्व संबंधित व्यक्ती / नागरीक यांना संस्थात्मक विलगीकरण करुन ठेवणे व शासन स्तरावरुन प्राप्त सुचनांचे योग्यरीतीने पालन होणे आवश्यक असल्याने सर्व संबंधित उदा. ग्रामस्तरीय अधिकारी उदा. तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, शिक्षक व इतर कर्मचारी यांनी त्यांचे मुख्यालयी राहणे बंधनकारक राहील.

3) सदर ग्रामस्तरीय अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना नेमून दिलेल्या कर्तव्याच्या ठिकाणी / मुख्यालयी हजर राहत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अशा तक्रारींची शहानिशा केल्यानंतर सदर तक्रारीबाबत तथ्य आढळून आल्यास संबंधितांवर नमूद कायद्यातील तरतुदींनुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 व भारतीय साथरोग अधिनियम 1897 मधील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 18/05/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

(डॉ. अविनाश ढाकणे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगांव
5. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
6. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
7. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव
8. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
9. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
10. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
11. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,जळगांव
12. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
13. सहायक कामगार आयुक्त,जळगांव
14. सहायक संचालक,अन्न व प्रशासन ,जळगांव
15. जिल्हा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र ,जळगांव
16. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,जळगांव
17. उप अभियंता, एम.आय.डी.सी.जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner